स्त्री जन्माचे स्वागत करा | कराचा भरणा वेळेवर करा | झाडे लावा झाडे जगवा

स्थापना ०६/०९/२०१६ | फोन नं. ०२४२७ (२४१०४५)

# नेवासा नगरपंचायत, नेवासा

नेवासा, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१४६०३

Email: - co.newasa@gmail.com

जा.क्र. न.पं. नेवासा/ बां.वि./ ८४३ /२०२६ दिनांक: १५/०५/२०२६

## जाहीर ई-निविदा सूचना सन २०२६-२७

मुख्याधिकारी, नेवासा नगरपंचायत, नेवासा, जिल्हा अहिल्यानगर यांच्या वतीने नगरपंचायत हद्दीतील खालीलप्रमाणे नमूद कामासाठी ई-निविदा मागवीत आहे. सदर कामी सार्वजनिक बांधकाम विभागात योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार/ एजन्सी यांचेकडून निविदा पद्धतीने निविदा मागवण्यात येत आहेत.

| कामाचे नाव | निविदा रक्कम रु. (GST व्यतिरिक्त) | इसारा रक्कम रु. | निविदा फॉर्म फी रक्कम रु. | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| नेवासा शहर हद्दीतील मुंबादेवी रोड ते पीयूष पवार घर रस्ता करणे.<br>प्रभाग क्र. २ मध्ये हिंदू स्मशानभूमी येथे ओटे व आसनव्यवस्थे संबंधित अनुषंगिक कामे करणे. | ३१४७१९२/- | ३१४७२/- | ५००० | १८० दिवस |

सदर संपूर्ण निविदा प्रक्रिया ई-निविदा पद्धतीने ऑनलाइन संगणक प्रणालीवर होईल. सदर जाहीर ई-निविदा सूचना प्रसिद्धी, आवश्यक असणारी कागदपत्रे, निविदा फॉर्म, इसारा रक्कम, शुद्धीपत्रक इत्यादीची माहिती https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध होईल. वरील कामाची निविदा खालील दिलेल्या कालावधीसाठी असेल.

| | | | |
|---|---|---|---|
| ई-निविदा प्रसिद्धी दिनांक | १५ /०५/२०२६ १२.०० वा. | निविदा विक्री अंतिम दिनांक | २२/०५/२०२६ १७.०० वा. |
| निविदा विक्री सुरुवात दिनांक | १५ /०५/२०२६ १२.०० वा. | निविदा सादर करणे अंतिम दिनांक | २२/०५/२०२६ १७.०० वा. |
| निविदा सादर करणे सुरुवात दिनांक | १५ /०५/२०२६ १४.०० वा. | निविदा उघडणे दिनांक (शक्य असल्यास) | २५/०५/२०२६ १०.०० वा. |

## ई-निविदेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे-

१. सदर कामाबाबत निविदा अटी शर्ती इ बाबतचा सर्व तपशील निविदासंचामध्ये व जाहीर ई-निविदा सूचना मध्ये नमूद केलेला असून निविदा संच ऑनलाईन https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर पहावयास उपलब्ध आहे.

२. दि. ११/०५/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये रु. ३० लक्षपेक्षा जास्त किंमतीच्या सर्वच निविदामध्ये Bid Capacity लागू आहे. तथापि एकाच कंत्राटदाराने एका वित्तीय वर्षात तीन किंवा त्यापेक्षा जास्त कामे घेतली असल्यास त्याच्यासाठी त्या वित्तीय वर्षात पुढील निविदांसाठी Bid Capacity ची अट लागू आहे. याकामी लिफाफा क्र. १ मध्ये चालू वित्तीय वर्षात घेतेलेल्या सर्व कामांची निविदाविषयक माहीती सादर करणे कंत्राटदारास बंधनकारक आहे. तसेच दि. ०७/१२/२०२३ शासन निर्णयातील सूचना निविदाधारकास बंधनकारक आहे.

३. ई-निविदा सादरीकरण/ स्विकृती फक्त ऑनलाईन पध्दतीनेच करण्यात येईल.

४. निविदाधारकास ई-निविदा पोर्टलवर निविदाबाबत "बीड लॉक" झाल्यानंतर कंत्राटदाराने निविदा सादर करावयाच्या वेळेपासून ७२ तासात तांत्रिक कागदपत्रांची हार्ड कॉपीची एक प्रत बंद पाकीटात इकडील कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक आहे. निविदाधारकाने हार्ड कॉपी सादर करताना जमा केल्याच्या कागदपत्रांची संख्या व पान क्रमांक हे अनुसुचीसह ई-निविदा क्रमांक व कामाचे नावासह नेवासा नगरपंचायत कार्यालयात जमा करणे बंधनकारक आहे.

५. तांत्रिक लिफाफा पडताळणी अंती पात्र कंत्राटदाराने **"माझा अर्थिक देकार उघडण्यात येवू नये" अथवा "मी स्पर्धेतून माघार घेत आहे"** असे कळविल्यास ते स्पष्टपणे नाकारण्यात येवून त्याचा अर्थिक देकार उघडण्यात येईल.

६. सदर निविदेसंदर्भातील शुध्दीपत्रक, निविदेतील बदल, अटी शर्तीतील बदल, निविदेबाबतची मुदतवाढ, निविदा मंजूरी स्तरावरील प्रक्रिया व निर्णय इ. बाबी https://mahatenders.gov.in या पोर्टलवर प्रसिध्द करण्यात येतील.

७. सदर कामाची निविदा फॉर्म फी रक्कम व इसारा रक्कम ऑनलाईन पध्दतीने भरावी.

८. निविदा सादरीकरण हे द्विलिफाफा पध्दतीने (Technical व Financial bid) करणे आवश्यक आहे.

९. **सिलबंद तात्रिक लिफाफा क्र. १** मध्ये पुढील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

अ) सार्वजनिक बांधकाम विभागात योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार नोंदणी प्रमाणपत्र.

आ) पॅन कार्ड व इनकम टॅक्स प्रमाणपत्र प्रत मागील ३ वर्षाचे आवश्यक.

इ) निविदा फॉर्म फी रक्कम व इसारा रक्कम भरलेली पावती.

ई) ई. पी. एफ. व जी. एस. टी. रजिस्ट्रेशन नोंदणी प्रमाणपत्र प्रत.

उ) शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१९/प्र. क्र. ४७/इमारती-२ दि. २५/१०/२०१९ नुसार काम पूर्ण केलेबाबतचा दाखला **(Workdone Certificate)** जोडणे बंधनकारक आहे अन्यथा सदर निविदा ग्राह्य धरण्यात येणार नाही.

**मागील ५ वर्षात, कंत्राटदाराने त्याच स्वरूपाच्या तुल्यबळ किमतीच्या, पूर्ण केलेल्या कामाची किमान किंमत- देय कामांच्या किंमतीनुसार (प्रचलित दराने)**

१. **तीन सारख्या पद्धतीची कामे** ज्यांची काम निहाय किंमत, बोलावण्यात आलेल्या निविदेच्या अंदाजित रकमेच्या **४०%** पेक्षा कमी नसावी. **(रु. १२५८८७७/-)**

**किंवा**

२. **दोन सारख्या पद्धतीची कामे** ज्यांची काम निहाय किंमत, बोलावण्यात आलेल्या निविदेच्या अंदाजित रकमेच्या **५०%** पेक्षा कमी नसावी. **(रु. १५७३५९६/-)**

**किंवा**

३. **एक सारख्या पद्धतीचे काम** ज्याची किंमत, बोलावण्यात आलेल्या निविदेच्या अंदाजित रकमेच्या ८०% पेक्षा कमी नसावी. **(रु. २५१७७५४/-)**

ऊ) **परिशिष्ट-अ, परिशिष्ट-ब** व **काळ्या यादीत समाविष्ट नसलेबाबत** प्रतिज्ञापत्र रक्कम **रु. १०० चे स्टॅम्प** पेपरवर सादर करणे बंधनकारक आहे.

ऋ) दि. ११/०५/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये Bid Capacity.

१०. तांत्रिक मनुष्यबळ प्रमाणपत्र व यंत्रसामुग्री कागदपत्रे.

११. सदर कामाकरीता उपलब्ध असलेल्या कर्मचारी यांची यादी विहीत फॉर्म मध्ये भरावी. व Declaration Of The Contractor वर माहिती भरुन स्वाक्षरी करून त्याची प्रत सोबत जोडावी.

१२. निविदेसोबत जोडलेल्या कागदपत्रांची तपासणी संबंधित निविदा समितीकडून केली जाते. यामध्ये निविदेसोबत जोडलेल्या खोट्या कागदपत्रांसंदर्भात संपूर्णपणे निविदा सादर करणारे कंत्राटदार जबाबदार राहतील. त्यास नेवासा नगरपंचायतचे निविदा छाननी करणारे अधिकारी जबाबदार राहणार नाहीत.

१३. कार्यारंभ आदेश दिल्यानंतर कंत्राटदारामार्फत सादर होणाऱ्या देयकांसोबत जोडण्यात आलेली कागदपत्रे खोटी आढळल्यास त्यासाठी संबंधित कंत्राटदार भारतीय दंड संहितेच्या विविध कलमाप्रमाणे कारवाईस पात्र

राहतील. अशा निविदेतील कामे प्रारंभिक स्तरावर असल्यास निविदा रद्द केली जाईल व कंत्राटदारास उपरोक्तप्रमाणे काळ्या यादीत टाकणेत येईल व वरीलप्रमाणे कारवाई करण्यात येईल.

१४. निविदा अंतिम करताना व दोष दायित्व कालावधीत मूळ निविदा व त्यानंतरचा पत्रव्यवहार, कंत्राटदराची देयके व त्यासोबतची साहित्य खरेदीची व अन्य बाबीची पुर्तता कागदपत्रे, चाचणी अहवाल इ. गुणवत्ता विषयक कागदपत्रे बनावट आढळल्यास त्या कंत्राटदार संपूर्णतः जबाबदार राहील. यासाठी नेवासा नगरपंचायत जबाबदार असणार नाहीत.

१५. एखादया कामाबाबत निविदाधारकास आक्षेप नोंदवायचे असल्यास त्याने सदर आक्षेप निविदेची तांत्रिक छाननी झाल्यानंतर (**पात्र/अपात्रतेबाबत** https://mahatenders.gov.in **पोर्टलवर प्रसिद्ध केल्यानंतर)** २ दिवसांच्या आत (४८ तासांत) नोंदविणे बंधनकारक आहे. त्यानंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

१६. **सिलबंद दराचा लिफाफा क्र. २** मध्ये संबंधीत ठेकेदाराने दर नमूद करुन स्वाक्षरीसह सोबत जोडणे आवश्यक आहे.

१७. अटीयुक्त निविदा विचारात घेतली जाणार नाही.

१८. यशस्वी ठेकेदारास योग्य किंमतीच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करुन द्यावा लागेल.

१९. सर्व साहित्य भारतीय रस्ते मानकाप्रमाणे असणे आवश्यक आहे वरील कामासाठी वापरण्यात येणारे साहित्य (मटेरीयल) योग्य असल्याबाबतचा प्रयोगशाळेकडील अहवाल (Test Report) सादर करणे अनिवार्य आहे व शासन निर्णयाप्रमाणे (थर्ड पार्टी) त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण संबंधीत संस्थेकडून करणे बंधनकारक आहे.

२०. शासन निर्णय दि. १४/०१/२०१९ प्रमाणे दोष दायित्व कालावधी निश्चित करण्यात आलेला आहे. दोष दायित्व कालावधीत काम खराब झाल्याचे दिसून आल्यास तसेच नेवासा नगरपंचायतीने कळविल्यास तात्काळ दुरुस्ती करणे बंधनकारक राहील. तसेच सुरक्षा अनामत रक्कम दोष दायित्व कालावधी पूर्ण झालेनंतर अदा करण्यात येईल.

२१. कोणत्याही परिस्थितीत भाववाढ देय असणार नाही.

२२. टेंडर मधील दर टेंडर उघडलेपासून १२० दिवस ग्राह्य राहतील.

२३. कामाचे देयक उपलब्ध निधीप्रमाणे प्रदान करण्यात येईल. याबाबत निविदाधारक यांना मा. न्यायालयात दाद मागता येणार नाही.

२४. शासकीय विमा कार्यारंभ आदेश प्राप्त झाल्याच्या १५ दिवसात भरणे बंधनकारक राहील.

२५. कोणतीही निविदा स्वीकारणे, नाकारणे अथवा रद्द करणे याबाबतचे अंतीम अधिकार निविदा समितीस राहील.

(प्रताप कडपे),
लिपीक, बांधकाम विभाग,
नेवासा नगरपंचायत, नेवासा

(सुनिल मागुर्डे),
नगरअभियंता,
नेवासा नगरपंचायत, नेवासा

(विकास घावटे),
अंतर्गत लेखापरीक्षक
नेवासा नगरपंचायत, नेवासा

(संतोष ढोले),
लेखापाल,
नेवासा नगरपंचायत, नेवासा

(ऋषिकेश पाटील),
मुख्याधिकारी,
नेवासा नगरपंचायत, नेवासा

नेवासा नगरपंचायत नेवासा
स्थापना ता. ६/१/२०१६
ता. नेवासा, जि. अहिल्यानगर

Signature Not Verified
Digitally signed by SUNIL KARTAR GANGURDE
Date: 2026.05.14 21:12:56 IST
Location: Maharashtra-MH